04 FEB 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भुयारी मार्गाचे काम मुदतीत पूर्ण करा

## मंत्री चंद्रकांत पाटील; शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांसह अन्य घटकांची होणार सोय

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरूपी जोडण्याकरिता बांधण्यात येत असलेल्या भुयारी मार्गामुळे विद्यापीठातील विद्यार्थ्यांची तसेच अन्य घटकांची मोठी सोय होणार आहे. मार्गाचे काम उत्तम पद्धतीने व मुदतीमध्ये पूर्ण करावे, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले. भुयारी मार्गाच्या कामाच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मंत्री पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचा विस्तार काळानुसार पूर्व व पश्चिम अशा दोन्ही बाजूंना होतो आहे. भविष्यात पूर्व बाजूला अनेक इमारती व संकुले निर्माण होणार असून दोन्ही बाजू भुयारी मार्गाने जोडण्याची मागणी होती. उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून निधीची तरतूद केल्याने हे काम गतीने पूर्ण होईल.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता एस. पी. कुंभार, कार्यकारी अभियंता एस. आर. पाटील, उपअभियंता हेमा जोशी, कनिष्ठ अभियंता पूजा देसाई, उपकुलसचिव (स्थापत्य) रणजित यादव, कामाचे ठेकेदार राजू इनामदार उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भुयारी मार्गाच्या भूमिपूजनप्रसंगी कोनशिला अनावरण करताना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव आदी. (छाया : नाज ट्रेनर)

### भुयारी मार्ग व सेवामार्गाच्या कामाचे स्वरूप

शिवाजी विद्यापीठाच्या पश्चिम बाजूने ग्रंथालयापासून पुणे-बेंगलोर रस्त्यापर्यंतचा एक भाग व रस्त्याच्या पूर्व बाजूपासून सर्व्हिस रस्त्यापर्यंत एक भाग असे दोन जोड रस्ते आहेत. पश्चिम बाजूकडील जोड रस्त्याची लांबी १६६.०० मीटर आहे. भुयारी मार्गापर्यंत रस्त्याचा उतार १:२० इतका आहे. पूर्व बाजूकडील जोड रस्त्याची लांबी २९.३२ मीटरआहे. भुयारी मार्गापासून सर्व्हिस रोडपर्यंतचा चढ १:३० इतका प्रस्तावित आहे.

### उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून २.५० कोटींचा निधी

कोल्हापूर शहरात येणाऱ्या व जाणाऱ्या जलदगती वाहनांच्या सातत्याने वाढत्या वर्दळीमुळे विद्यापीठाच्या पूर्व बाजूकडून पश्चिम बाजूकडे ये-जा करणाऱ्या विद्यार्थी व शिक्षक वर्गासाठी रस्ता असुरक्षित बनला आहे. भुयारी मार्ग व सर्व्हिस रस्ता बांधण्यासाठी विद्यापीठाने शासनाकडे ८.४८ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर केला होता. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने २.५० कोटी रुपयांचा निधी वितरित केला. त्यामधून कामास प्रारंभ करण्यात येत आहे.

04 FEB 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भुयारी मार्ग उत्तम पद्धतीने मुदतीत पूर्ण करा

## मंत्री चंद्रकांत पाटील : शिवाजी विद्यापीठात कामाचे भूमिपूजन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरूपी जोडणाऱ्या भुयारी मार्गाचे काम उत्तम पद्धतीने मुदतीत पूर्ण करावे, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सार्वजनिक व बांधकाम विभागाच्या ठेकेदारांना आज येथे दिले. त्यांच्या हस्ते कुदळ मारून व कोनशिलेचे अनावरण करून भूमिपूजन करण्यात आले. त्या प्रसंगी ते बोलत होते. पाटील यांच्या विशेष प्रयत्नांमुळे शासनाकडून भुयारी मार्गासाठी आठ कोटी ४८ लाख ८९ हजार ९४५ रुपयांचा निधी मंजूर झाला. पैकी पहिल्या टप्प्यात दोन कोटी ५० लाख रुपयांचा निधी मिळाला आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भुयारी मार्गाच्या भूमिपूजनप्रसंगी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते कोनशिलेचे अनावरण झाले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव आदी उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले, ''विद्यापीठाचा विस्तार काळानुसार पूर्व व पश्चिम अशा दोन्ही बाजूंनी होत आहे. भविष्यातही पूर्व बाजूला अनेक इमारती व संकुले निर्माण करण्यात येणार आहेत. या दोन्ही बाजूंकडील विद्यार्थी, शिक्षक व अभ्यागत आदींची वर्दळ महामार्गावरून वाढली होती. त्यातून अनेक छोटे-मोठे अपघात घडले. त्यामुळे या दोन्ही बाजू भुयारी मार्गाने जोडण्याची विद्यापीठाची मागणी होती. माझ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्रिपदाच्या कार्यकाळात त्यास मान्यता देण्यात आली. आता उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून निधीची तरतूद केल्याने हे काम गतीने पूर्ण होईल.''

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता एस. पी. कुंभार, कार्यकारी अभियंता एस. आर. पाटील, उपअभियंता हेमा जोशी, कनिष्ठ अभियंता पूजा देसाई, उपकुलसचिव (स्थापत्य) रणजित यादव, कामाचे ठेकेदार राजू इनामदार उपस्थित होते.

**विद्यापीठाच्या पूर्व बाजूकडील विस्तार**

विद्यापीठाचा सुमारे ८५३ एकरांचा परिसर महापालिकेच्या ताब्यात असणाऱ्या जुन्या पुणे-बंगळूर महामार्गाच्या पूर्व व पश्चिम बाजूस विभागला आहे. पश्चिम भागात मुख्य प्रशासकीय, विविध अधिविभागांच्या इमारती, क्रीडा संकुल, पूर्व भागात तंत्रज्ञान अधिविभाग, स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, शाहू रिसर्च सेंटर, शिक्षणशास्त्र, इतिहास, जर्नालिझम व मास कम्युनिकेशन, सायबर सिक्युरिटी सेंटर आहे. पूर्व बाजूला यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, वाणिज्य आणि व्यवस्थापन अधिविभागाच्या इमारतींचे बांधकाम सुरू आहे.

**असा होणार भुयारी, सेवा मार्ग**

विद्यापीठाच्या पश्चिम बाजूने ग्रंथालयापासून पुणे-बंगळूर रस्त्यापर्यंतचा एक भाग व रस्त्याच्या पूर्व बाजूपासून सर्व्हिस रस्त्यापर्यंत एक भाग असे दोन जोड रस्ते आहेत. पश्चिम बाजूकडील जोड रस्त्याची लांबी १६६ मीटर आहे. भुयारी मार्गाची एकूण लांबी ३१.३२ मीटर असून, त्याची रुंदी ८.५० मीटर आणि उंची ३.०० मीटर इतकी आहे.

04 FEB 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भुयारी मार्गाचे काम मुदतीत पूर्ण करा

## मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या सूचना : शिवाजी विद्यापीठात भूमिपूजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरूपी जोडण्याकरिता बांधण्यात येत असलेल्या भुयारी मार्गाचे काम उत्तम आणि मुदतीमध्ये पूर्ण करावे, असे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी शनिवारी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. या कामाचे भूमिपूजन मंत्री पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कामासाठी महाराष्ट्र शासनाकडून ८ कोटी ४८ लाख ८१ हजार ९४५ रुपयांचा निधी मंजूर आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात २ कोटी ५० लाख रुपयांचा निधी प्राप्तही झाला आहे. त्यामधून या कामास प्रारंभ करण्यात आला. मंत्री पाटील म्हणाले की, विद्यापीठाच्या दोन्ही बाजू भुयारी मार्गाने जोडण्याची मागणी होती. माझ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्रिपदाच्या कार्यकाळात त्यास मान्यता दिली. आता उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून निधीची तरतूद केल्याने हे काम गतीने पूर्ण होईल.यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता एस.पी. कुंभार, एस.आर. पाटील, हेमा जोशी, पूजा देसाई, रणजीत यादव, ठेकेदार राजू इनामदार उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठातील भुयारी मार्गाचे कोनशिला अनावरण उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते शनिवारी झाले. यावेळी कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव उपस्थित होते.

### भुयारी मार्ग व सेवामार्गाच्या कामाचे स्वरूप

- विद्यापीठाच्या पश्चिम बाजूने ग्रंथालयापासून पुणे-बंगळुरु रस्त्यापर्यंतचा एक भाग व रस्त्याच्या पूर्व बाजूपासून सर्व्हिस रस्त्यापर्यंत एक भाग असे दोन जोड रस्ते आहेत.
- पश्चिम बाजूकडील जोड रस्त्याची लांबी १६६.०० मीटर आहे.
- भुयारी मार्गापर्यंत रस्त्याचा उतार १:२० इतका आहे.
- पूर्व बाजूकडील जोड रस्त्याची लांबी २९.३२ मीटर इतकी आहे.
- भुयारी मार्गापासून सर्व्हिस रोडपर्यंतचा चढ १:३० इतका प्रस्तावित आहे.
- भुयारी मार्गाची एकूण लांबी (३१.३२ मीटर) असून त्याची रुंदी ८.५० मीटर आणि उंची ३.०० मीटर इतकी आहे.

04 FEB 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या भुयारी मार्गाचे काम मुदतीत करा

## उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या सूचना

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरूपी जोडण्यासाठी बांधण्यात येत असलेल्या भुयारी मार्गामुळे विद्यापीठातील विद्यार्थ्यांची, तसेच अन्य घटकांची मोठी सोय होणार आहे. हे काम उत्तम पद्धतीने आणि मुदतीमध्ये पूर्ण करावे, असे निर्देश राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना, तसेच ठेकेदारांना दिले. या मार्गाच्या कामाचे भूमिपूजन शनिवारी दुपारी मंत्री पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

मंत्री पाटील यांच्या प्रयत्नांमुळे विद्यापीठाच्या भुयारी मार्गाच्या कामासाठी महाराष्ट्र शासनाकडून ८ कोटी ४८ लाख ८१ हजार ९४५ रुपयांचा निधी मंजूर झाला. त्यापैकी पहिल्या टप्प्यात २ कोटी ५० लाख रुपयांचा निधी विद्यापीठास प्राप्तही



कोल्हापूर : विद्यापीठातील भुयारी मार्गाच्या भूमिपूजनप्रसंगी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील. सोबत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव आदी.

झाला आहे.

मंत्री पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचा विस्तार काळानुसार पूर्व व पश्चिम अशा दोन्ही बाजूंना होतो आहे. भविष्यातही पूर्व बाजूला अनेक इमारती व संकुले निर्माण करण्यात येणार आहेत. या रस्त्यावर अनेक छोटे-मोठे अपघात घडले. त्यामुळे दोन्ही बाजू भुयारी मार्गाने जोडण्याची विद्यापीठाची मागणी होती. माझ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्रिपदाच्या कार्यकाळात त्यास मान्यता देण्यात आली. आता उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून निधीची तरतूद केल्याने हे काम गतीने पूर्ण होईल.

मंत्री पाटील यांच्या हस्ते कार्यस्थळी कुदळ मारून, तसेच कोनशिलेचे अनावरण करून भूमिपूजन समारंभ करण्यात आला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, एस. पी. कुंभार, एस. आर. पाटील, हेमा जोशी, पूजा देसाई, रणजित यादव, राजू इनामदार आदी उपस्थित होते.

0 4 FEB 2024
लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणी आवश्यक - चंद्रकांत पाटील

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



राज्यस्तरीय प्राचार्य महासंघाच्या अधिवेशनाचे उद्घाटन उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दीपप्रज्वलनाने केले.

कोल्हापूर : प्राचार्यांचे सर्व प्रलंबित प्रश्न निश्चितपणे सोडवण्यात येतील. तथापि नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी अत्यावश्यक असल्याने त्याकडे त्यांनी लक्ष पुरवले पाहिजे, असे प्रतिपादन उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी शनिवारी केले.

शिवाजी विद्यापीठ प्राचार्य असोसिएशनच्या वतीने महाराष्ट्र शासकीय महाविद्यालय प्राचार्य महासंघाच्या ३९ व्या वार्षिक अधिवेशनास आज येथे प्रारंभ झाला. मंत्री पाटील यांनी दीपप्रज्वलन करून अधिवेशनाचे उद्घाटन केले.

ते म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणामुळे संशोधनात चालना मिळेल. देशाची आर्थिक स्थिती भक्कम होणार आहे. जगाला आवश्यक असणारे बौद्धिक मनुष्यबळ नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीतून पुरवणे शक्य होणार आहे. जगाच्या विकासाची दारे यामुळे खुली होणार असल्याने अधिक लक्ष पुरवले पाहिजे.

शिवाजी विद्यापीठ प्राचार्य असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. क्रांतीकुमार पाटील यांनी प्रास्ताविकात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती होत नसल्याने महाविद्यालये चालवायची कशी, असा प्रश्न उपस्थित केला. नवीन शैक्षणिक धोरण २०२० या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, विद्यापीठाच्यावतीने सर्व महाविद्यालयात नवीन शैक्षणिक धोरण राबवले जाणार असून त्यासाठीची सर्व तयारी विद्यापीठाने केली आहे. विद्यार्थ्यांना परिपूर्ण बनवणारे हे धोरण असल्याने त्याचे सर्वांनी स्वागत करावे.

अन्य एका परिसंवादात माजी कुलगुरू डॉ. माणिक शिंदे यांनी नवे शैक्षणिक धोरण राबवण्यातील आव्हानांचा ऊहापोह केला तर रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत दळवी यांनी धोरण राबवताना सकारात्मक कसे राहावे याविषयी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ. सुजय पाटील, डॉ. नीता धुमाळ यांनी केले. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी
04 FEB 2024

# खेळाकडे करिअरचा मार्ग म्हणून पाहा

## मंत्री चंद्रकांत पाटील; 'पुढारी राईज अप' महिला क्रीडा स्पर्धेत दुसऱ्या दिवशीही रंगत

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

खेळाकडे करिअर म्हणून बघा, त्यादृष्टीनेच यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करा, असा सल्ला राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांत पाटील यांनी शनिवारी 'पुढारी राईज अप' महिला क्रीडा स्पर्धेतील सहभागी खेळाडूंना दिला. शिवाजी विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकवर सुरू असलेल्या या स्पर्धेत दुसऱ्या दिवशी पाटील यांच्या हस्ते शंभर मीटर धावणे प्रकाराचा शुभारंभ झाला.




कोल्हापूर : 'पुढारी राईज अप' महिला क्रीडा स्पर्धा अ‍ॅथलेटिक्स-२४ स्पर्धेत शनिवारी बोलताना राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील. यावेळी उपस्थित शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, 'पुढारी'चे सरव्यवस्थापक राजेंद्र मांडवकर, राहुल चिकोडे, 'पुढारी'चे नॅशनल हेड (मार्केटिंग) आनंद दत्ता आदी. (छाया : अर्जुन टाकळकर)

दै. 'पुढारी'च्या वतीने आयोजित 'पुढारी राईज अप' महिला क्रीडा स्पर्धा अ‍ॅथलेटिक्स-२४ स्पर्धेचा शनिवारी दुसरा दिवस होता. ९ ते १९ वर्षांखालील मुलींसाठी आयोजित या स्पर्धेत दुसऱ्या दिवशीही रंगत होती.

स्पर्धेचे प्रमुख पाहुणे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पाटील म्हणाले, केवळ हौस म्हणून खेळाकडे पाहू नका. अन्य करिअर प्रमाणेच खेळात सुद्धा चांगले करिअर करता येते. यामुळे खेळाकडे करिअर म्हणूनच बघा. यापूर्वी सायंकाळी खेळण्यासाठी जाताना पालकही मुलांना खेळायला जाऊ देत नव्हते, पण आता परिस्थिती बदलली आहे. खेळ ही एक प्रकारची गुंतवणूक म्हणूनच पालक त्याकडे पाहत असल्याचेही त्यांनी सांगितले.

पुढारी RISE UP Female Sports Tournament 2024
Presented By
Oxyrich

देशात २०१४ नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खेळासाठी पोषक वातावरण तयार केल्याचे सांगत पाटील म्हणाले, आजही खेळाडू परदेशात खेळण्यासाठी जातात, त्यावेळीही पंतप्रधान त्याकडे लक्ष ठेवून असतात. अगदी पराभूत झालेल्यांनाही बोलावून धीर देत, पुढील वेळेसाठी चांगली तयारी करायला प्रोत्साहन देत आहेत. केंद्र व राज्य शासनही खेळाडूंना उत्तेजन देण्यासाठी चांगले प्रयत्न करत आहेत. चांगली बक्षिसे देत आहेत. पाच टक्के नोकरीत आरक्षण दिले जात आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर कास्यपदक विजेत्यालाही वर्ग १ ची नोकरी दिली जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

कोल्हापूरला खेळाची मोठी परंपरा आहे, असे सांगत पाटील म्हणाले, कोल्हापूर म्हणजे कुस्ती असे म्हटले जात होते. मात्र, सध्या नेमबाजी, फुटबॉल, क्रिकेट अशा सर्वच खेळात कोल्हापूरचे खेळाडू नाव गाजवत आहेत. वर्तमानपत्र म्हणून असे उपक्रम राबविणे हे माध्यमांचे काम नाही. मात्र, जी जी गोष्ट समाजाच्या उपयोगी पडेल, ती ती प्रत्येक गोष्ट केली पाहिजे, ही भूमिका दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव आणि 'पुढारी'चे चेअरमन डॉ. योगेश जाधव यांची आहे. त्यातून आयोजित हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गारही त्यांनी काढले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, राहुल चिकोडे आदी उपस्थित होते.

### खेळाडूंशी साधला संवाद

या स्पर्धेत वय वर्षे नऊ ते १९ वर्षांखालील मुली, युवती सहभागी झाल्या आहेत. मंत्री पाटील यांनी स्पर्धेतील सहभागी एका दहा वर्षीय खेळाडूशी संवाद साधला. कोठून आली आहे, कशी आली आहे, कोणकोण सोबत आहेत, किती अंतर धावणार आहेस आदी प्रश्न पाटील यांनी विचारले. त्यावर ती देत असलेल्या उत्तराने पाटील यांच्या चेहऱ्यावर कुतूहलाचे भाव दिसत होते. त्या मुलीशी हस्तांदोलन करत त्यांनी उपस्थित सर्वच महिला खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

### सिंथेटिक ट्रॅक सरावासाठी मिळणार

यावेळी पाटील यांनी पुण्यानंतर कोल्हापुरातच सिंथेटिक ट्रॅक असल्याचे सांगितले. यावेळी सातारा जिल्ह्यातील एका राष्ट्रीय शालेय खेळाडूने शालेय विद्यार्थ्यांसाठी सरावासाठी सिंथेटिक ट्रॅक या तीन जिल्ह्यांत उपलब्ध नसल्याचे सांगितले. दरम्यान, कुलसचिव डॉ. शिंदे यांनी विद्यापीठाच्या 'मिशन ऑलिम्पिक' योजनेअंतर्गत शालेय विद्यार्थ्यांसाठीही हा ट्रॅक सरावासाठी उपलब्ध करून देणार असल्याचे सांगितले.

जनसंपर्क कक्ष
04 FEB 2024 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इतिहासाचे पुनर्लेखन ही काळाची गरज : डॉ. साळुंखे

## कुंडल येथे शिवाजी विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

कुंडल : इतिहासाचे पुनर्लेखन ही काळाची गरज असून ते सत्याला प्रमाण मानून होणे गरजेचे आहे, असे मत प्राध्यापक डॉ. आ. ह. साळुंखे यांनी मांडले.

ते कुंडल (ता. पलूस) येथे शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ व क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालय आयोजित आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी आमदार अरुण लाड होते. जिल्हा बँकेचे माजी संचालक किरण लाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

साळुंखे म्हणाले, क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापूंशी असलेले ऋणानुबंध मला कामाची प्रेरणा देतात. भारतीय इतिहासाचे पुनर्लेखन झाले पाहिजे. त्यात दोन प्रवाह असतात, त्यातील त्रुटी दूर व्हायच्या असतील तर त्याचे पुनर्लेखन गरजेचे आहे. त्याने समाजाचा समतोल साधला जाऊ शकतो.

मराठी संस्कृती इतकी श्रेष्ठ आहे की अनेक संतांचे अभंग, शीख समुदायाच्या धर्मग्रंथात समाविष्ट केले आहेत. त्यामुळे समग्र इतिहास समोर येण्यासाठी पुनर्लेखन हे काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात अरुण लाड म्हणाले, वस्तुनिष्ठ इतिहास गरजेचा आहे. क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापूंना वस्तुनिष्ठता आवडायची आणि ते आयुष्यभर या प्रश्नांसाठी झटले. वाङ्मयातून अभ्यासूपणे इतिहास पुढे यावा याचेच या चर्चासत्रात विवेचन व्हावे. यातून देशाला आणि नवीन पिढीला वस्तुनिष्ठ इतिहास मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 FEB 2024
लोकमत

# विद्यापीठात 'समस्या तुमची, सांख्यिकीय उत्तर आमचे' उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील संख्याशास्त्र अधिविभागाने समस्या तुमची, सांख्यिकीय उत्तर आमचे या अभिनव उपक्रमाचे २३ व २४ फेब्रुवारीला आयोजन केले आहे.

या उपक्रमामध्ये कृषी, उद्योग, व्यवसाय, आरोग्यसेवा, व्यापार, शैक्षणिक संस्था, सहकारी संस्था, संशोधन संस्था आदी क्षेत्रांमध्ये कार्यरत असणाऱ्या व्यक्तींना तसेच संशोधकांना त्यांच्या क्षेत्रातील प्रश्न अथवा समस्येची उकल करण्याच्या अनुषंगाने आवश्यक संख्याशास्त्रीय सल्ला तज्ज्ञांकडून मोफत दिला जाणार आहे. इच्छुकांनी समस्येविषयीची माहिती https://forms.gle/Q8wW2umR1QWjY8MT7 या लिंकवर भरावी. प्राप्त होणाऱ्या समस्यांपैकी काही निवडक समस्यांवर चर्चा करण्यासाठी संबंधितांना २३ फेब्रुवारी रोजी बोलवण्यात येईल. या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. शशिभूषण महाडिक यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 FEB 2024
पुढारी

# एमबीए विभागाच्या रक्तदान शिबिरास प्रतिसाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एमबीए विभागाच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात ७६ जणांनी रक्तदान केले. शिवाजी विद्यापीठाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. व्ही. ए. रानडे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्या म्हणाल्या, रक्तदानामुळे शरीर व मनावर सकारात्मक परिणाम होतो. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे हॉस्पिटल रक्तपेढीचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अजय शिराळे यांनी रक्तदान करताना घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. शिबिरास प्रा. डॉ. के. व्ही. मारुलकर यांनी मार्गदर्शन केले. एमबीए विभागाच्या श्रद्धा शेटके यांनी प्रास्ताविक केले. दिग्विजय माळी यांनी आभार मानले. शिबिर यशस्वितेसाठी प्रा. डॉ. ए. एम. गुरव, प्र. संचालक, एमबीए विभाग यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी प्रा. डॉ. दीपा इंगवले, डॉ. तेजश्री घोडके, जयश्री लोखंडे, डॉ. परशुराम देवळी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 FEB 2024

पुढारी



कोल्हापूर : कारभारवाडीत सामुदायिक पद्धतीने केलेल्या जरबेरा फूलशेतीची माहिती घेताना पत्रकारितेचे विद्यार्थी.

# शिवाजी विद्यापीठ पत्रकारिता विभागाच्या विद्यार्थ्यांची कारभारवाडी गावाला भेट

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या विद्यार्थ्यांनी नुकतीच कारभारवाडी (ता. करवीर) गावाला भेट देऊन ग्रामस्थांशी शेती व शेतीपूरक उद्योगासंदर्भात संवाद साधला. येथील शंभर एकर शेतजमीन ठिबक सिंचनाद्वारे संगणकीय पद्धतीने ओलिताखाली आणली आहे. यामुळे पाण्याची बचत होऊन एकरी उत्पादन वाढले. गांडूळ खताचे येथे एकूण ३४ बेड आहेत. एक एकर परिसरात शेतकऱ्यांनी सामुदायिक पद्धतीने जरबेरा फूल शेती केली आहे. जरबेराची फुले मुंबई, हैदराबाद बाजारपेठेत पाठविली जातात, असे प्रकल्पाचे संकल्पक डॉ. नेताजी पाटील यांनी सांगितले. येथील गूळनिर्मितीच्या अत्याधुनिक प्रकल्पात स्थानिक शेतकऱ्यांकडून ऊस खरेदी करून गाळप केले जाते. यातून 'कारभारी गोडवा' नावाचा एक ब्रँड शेतकऱ्यांनी विकसित केला आहे. या गुळाला जागतिक बाजारपेठेत मागणी असून येथील बहुतेक गूळ कॅनडाला निर्यात केला जातो, अशी माहिती प्रकल्प व्यवस्थापक राजेंद्र पाटील यांनी दिली. पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांच्या मार्गदर्शनाने डॉ. शिवाजी जाधव यांच्या नेतृत्वाखाली अभ्यास दौरा झाला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 FEB 2024
पुण्यनगरी

# पदवीच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर

## विद्यापीठाचा निर्णय : प्रथम, द्वितीय वर्षासाठी नियोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम व द्वितीय वर्ष परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मार्च/एप्रिल, २०२४ या उन्हाळी सत्रातील परीक्षेचे आयोजन दि. २६ मार्च ते ३० एप्रिल या कालावधीमध्ये महाविद्यालय स्तरावर करावे, अशा सूचना परक्षीा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी संबधितांना दिल्या.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून पदवी स्तरावरील अभ्यासक्रमाच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या सर्व परीक्षा महाविद्यालय स्तरावर आयोजन करण्यास विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिली आहे. त्यानुसार मार्च/एप्रिल, २०२४ उन्हाळी सत्रातील परीक्षेचे आयोजन करण्यात येत आहे. परीक्षांचे वेळापत्रक, प्रश्नपत्रिका आणि परीक्षा आयोजन व मूल्यमापन हे महाविद्यालय स्तरावर केले जाणार आहे. या परीक्षा दि. २६ मार्च ते ३० एप्रिलपर्यंत घ्यायची असून या कालावधीत सर्व कार्यवाही करावयाची आहे. सर्व प्रक्रिया महाविद्यालय स्तरावर होणार असली तरी मूल्यमापन विद्यापीठाच्या परीक्षा विभागाच्या नियमावली व मार्गदर्शक होणार आहे, असेही नमद केले आहे.

